नि.फौ.ख.क्र.८८/२०२६

सरकार -वि- सौरभ, **नि.क्र.१३**

<u>**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – मुकेश वासुदेव बिसने

वय. ५३ वर्षे, व्यवसाय – पानठेला,

निवासस्थान – दत्तात्रय वार्ड, तुमसर ता. तुमसर, जिल्हा – भंडारा.

<u>**सरतपासणी सरकार तर्फे श्री. पी.आर. भलावी सहा. सरकारी अभियोक्ता यांच्या मार्फत –**</u>

पोलीसांनी माझेसमक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही. परंतु मी पोलीसांच्या कागदपत्रांवर सह्या केल्या होत्या. आता मला अभिलेखावरील सुचनापत्र, घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामे दाखविण्यात आले. त्यावर माझ्या सह्या आहे. त्यातील मजकुराबाबत मला काही माहिती नाही. सह्यांना अनुक्रमे **निशाणी १४ ते १७** देण्यात येते.

**साक्षीदार अभियोग पक्षाच्या प्रकरणास दुजोरा देत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात येत आहे.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २१.१२.२०२५ रोजी पोलिसांनी मला पंच म्हणुन हजर राहण्यासाठी सुचनापत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांसोबत मी गौरीशंकर कॉम्पलेक्स समोर राजेंद्र नगर येथे पंचनाम्याच्या कार्यवाहीसाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझेसमक्ष वीटेचे दोन तुकडे जप्त केले होते. हे म्हणणे खरे नाही की, तसेच एका पांढ–या रंगाच्या बॅन्डेज पट्टीचे रक्ताने माखलेले तुकडे पोलीसांनी माझेसमक्ष जप्त केले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपी सुध्दा हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझे ओळखीचे असल्यामुळे आज मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

<u>**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. गहाणे यांच्या मार्फत**</u> **–**

३. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझी सही घेतली त्याव्यतिरिक्त त्यांनी काय कार्यवाही केली त्याबाबत मला काही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझेसमक्ष कोणत्याही वीटा जप्त करण्यात आल्या नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या कशा संदर्भातील

वीटा होत्या याबाबत मला काही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या वीटा पोलीसांनी कुठून आणल्या होत्या याबाबत मला काही माहिती नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/- | स्वा/- |
| (आर. पी. बाठे) | (आर. पी. बाठे) |
| न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर | न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर |
| दि. १०.०८.२०२६ | दि.१०.०८.२०२६ |